आर्थिक गुन्हे शाखा

पोलीस अधीक्षक कार्यालय, सातारा

वृत्तपत्र दि.१६/०५/२०२६

कालिकाई इंडस्ट्रिज इंडिया कंपनी, पाटण शाखा जि. सातारा या कंपनीमध्ये आर्थिक गुंतवणूक केलेल्या ठेवीदारांना जाहीर आवाहन

---

कालिकाई इंडस्ट्रिज इंडिया कंपनी, पाटण शाखा, जि. सातारा या कंपनीमध्ये आर्थिक गुंतवणूक केलेल्या ठेवीदारांची फसवणूक झाल्याबाबत पाटण पोलीस ठाणे येथे गु.नों.क्र. १६/२०२२ कलम ४२०, ४०६, ३४ भा.दं.सं. सह कलम ३ व ४ महाराष्ट्र ठेवीदारांचे (वित्तीय संस्थामधील) हितसंबधांचे संरक्षण अधिनियम, १९९९ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर गुन्हयाचा तपास आर्थिक गुन्हे शाखा, पोलीस अधीक्षक कार्यालय, सातारा कडे असुन सदर गुन्ह्याचा तपास पोलीस निरीक्षक हेमंतकुमार शहा हे करीत आहेत.

या कंपनीचे कार्यक्षेत्र सातारा जिल्ह्यासहीत इतर जिल्ह्यांत होते.

कालिकाई इंडस्ट्रिज इंडिया कंपनी, पाटण शाखा, जि. सातारा या कंपनीमध्ये ज्या गुंतवणूकदारांनी आर्थिक व अन्य गुंतवणूक केली आहे, त्यांनी महाराष्ट्र शासन, गृह विभाग शासन परिपत्रक क्र. एमपीआय १११९/ प्र.क्र.०९/पोल-११, दि.२५/०२/२०१९ मध्ये दिलेल्या निर्देशा प्रमाणे गुंतवणूकदारांनी भरुन द्यावयाच्या विहीत नमुन्यातील फॉर्म बाबत तसेच आर्थिक गुंतवणूकीच्या जनजागृतीबाबत आज दि.१६/०५/२०२६ रोजी सकाळी १०.३० वा ते १३.०० वाजेपर्यंत सुस्वाद हॉल, पाटण येथे पाटण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक श्री. अविनाश कवठेकर यांच्या उपस्थितीत व नियोजनाखाली बैठक पार पडली. सदर बैठकीस श्री. शंकर मोहिते, पत्रकार व सामाजिक कार्यकर्ते तसेच अन्य नागरीक उपस्थित होते. वर नमुद गुन्हयाच्या अनुषंगाने ठेविदारांनी करावयाच्या कार्यवाहीची माहिती आर्थिक गुन्हे शाखा, साताराचे श्री. हेमंतकुमार शहा, पोलीस निरीक्षक यांनी दिली. यावेळी त्यांचे सहकारी म.पो.हवालदार वैशाली गुरव आणि पो.हवालदार संतोष राऊत यांनी सुद्धा भाग घेतला.

कालिकाई इंडस्ट्रिज इंडिया कंपनी, पाटण शाखा, जि. सातारा या कंपनीमध्ये ज्या गुंतवणूकदारांनी आर्थिक व अन्य गुंतवणूक केली आहे, त्यांनी महाराष्ट्र शासन, गृह विभाग शासन परिपत्रक क्र. एमपीआय १११९/ प्र.क्र.०९/पोल-११, दि.२५/०२/२०१९ मध्ये दिलेल्या निर्देशा प्रमाणे गुंतवणूकदारांनी भरुन द्यावयाच्या विहीत नमुन्यातील फॉर्म भरुन देण्याबाबत दि.१६/०५/२०२६ ते दि.३१/०५/२०२६ या कालावधीत सकाळी १०.०० वा. ते दुपारी १२.३० वाजण्याच्या दरम्यान आर्थिक गुन्हे शाखा, पोलीस अधीक्षक कार्यालय, सातारा येथे खालील कागदपत्रांसह चौकशीकामी उपस्थित रहावे.

(१) गुंतवणूक केल्याचा पुरावा, उदाहरणार्थ :- मुळ ठेव पावती, प्रमाणपत्र, ज्या बँकेच्या खात्यातून आर्थिक व्यवहार झालेला आहे, त्या आर्थिक व्यवहाराचे बँक खात्याचे स्टेटमेंट व अन्य पुरावा.

(२) गुंतवणूकदाराचे बँक पासबुकच्या पहिल्या पानाची ठळक व सुस्पष्ट दिसणा-या २ झेरॉक्स प्रती.

(३) गुंतवणूकदाराचे आधारकार्ड

(४) गुंतवणूकदाराचे पॅनकार्ड

(५) गुंतवणूकदारास अंशतः किंवा पुर्णतः किंवा गुंतवणूकदारास मिळालेल्या परताव्याचा पुरावा,
उदाहरणार्थ :- पावती, ज्या बँकेच्या खात्यातून आर्थिक व्यवहार झालेला आहे, त्या आर्थिक व्यवहाराचे बँक खात्याचे स्टेटमेंट व अन्य पुरावा.

(६) फसवणूक झालेल्या कर्जदारांनी त्यांच्याकडील कर्जाबाबतची सर्व कागदपत्रे

(७) वर नमूद कागदपत्रांच्या ठळक व सुस्पष्ट दिसणा-या २ झेरॉक्स प्रती.

---